**दिनांक 15 मार्च, 2014 रोजी सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग यांची कर्जत येथील निरीक्षणगृहास भेट.**

दिनांक 15 मार्च, 2014 रोजी सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग यांनी कर्जत येथील निरीक्षणागृहास भेट दिली. भेटीदरम्यान ब–याच विधीग्रस्त बालकांनी अशी माहिती दिली की, त्यांची प्रकरणे गेली वर्षभरापासून प्रलंबित असून त्यावर काही निर्णय दिला गेला नाही. त्यांचे आई वडिल तसेच पालक नेहमी त्यांना घेऊन जाण्याकरिता येतात परंतु बाल न्याय मंडळ यांनी त्यांच्याबद्दल काही निर्णय न दिल्यामुळे ते अजूनही निरीक्षणगृहात राहतात. यावर आवश्यक कार्यवाहीबद्दल तेथील नियंत्रक, सुपरवायझर यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी ही माहिती खरी आहे असे कबूल केले. हे प्रकरण बाल न्याय मंडळाकडे असल्यामुळे ते काही करू शकत नाहीत. त्यांनी अशी माहिती दिली की, जिल्हा न्यायधीश हेसुध्दा तपासणीसाठी आले होते. अधीक्षकांना याबाबत सखोल अहवाल देण्याबाबत निर्देश दिले. तसेच या प्रकरणी प्रकरणनिहाय माहिती जेजेबी कडून घेऊन अहवालात ती सादर करावी असे निर्देश निरीक्षकांना देण्यात आले. या प्रकरणात बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष यांना एक पत्र आयोगाकडून पाठवावे लागेल. निरीक्षणगृहात विधीग्रस्त बालकांचे प्रकरणी निर्णय होऊन, त्यांना पालकांकडे पाठविण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याकरिता बाल हक्क संरक्षण आयोग आवश्यक सहकार्य करील